(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

८५६ सर्वोच्च न्यायालय अहवाल (१९९६) १ एस सी आर

हुस्ना आणि इतर

वि.

पंजाब राज्य

२३ जानेवारी, १९९८

( न्यायमूर्ती ए. एस.आनंद आणि न्या. जी. टी. नानावटी)

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३:

कलम १६२ - पोलिसांना जबाब - ग्राह्यता - एफ आय आर मध्ये आरोपीचे नाव नाही - तपासादरम्यान नोंदविलेल्या फिर्यादीच्या पुरवणी जबाबात आरोपीचे नाव - निर्णय दिला की कलम १६२ लागू होते आणि एफआयआर चा भाग म्हणून त्यावर अवलंबून राहू शकत नाही.

भारतीय दंड संहिता, १८६०.

कलम ३०२, ३०२/३४, ४४० - आरोपीने घरात बेकायदेशीर घुसखोरी केली - एका घुसखोऱ्याने फिर्यादीच्या मुलाची गोळ्या झाडून हत्या केली - आरोपीचे नाव एफ आय आर मध्ये नाही परंतु फिर्यादीने तपासादरम्यान पोलिसांनी नोंदवलेल्या पुरवणी जबाबात त्यांची नावे नोंदवली - न्यायचौकशी न्यायालयाने गोळी झाडणाऱ्या

आरोपीला कलम ३०२, ४४९ आय पी सी  आणि शस्त्र  अधिनियम कलम २५ नुसार दोषी ठरवले - इतर आरोपींना कलम ३०२/३४ अंतर्गत  दोषी ठरवले - पहिल्याची दोषसिध्दी  आणि शिक्षा कायम ठेवली परंतु संशयाचा फायदा  देत  इतरांची  शिक्षा  रद्द केली - न्याय चौकशी न्यायालयाने पुरवणी जबाब एफआयआर चा भाग  म्हणून अवलंबून नसावे कारण  त्याला सीआरपीसीचे कलम १६२ लागू होते.

शस्त्र अधिनियम, १९५९ :

कलम २५ - आरोपीकडून  पिस्तूल जप्त करण्याबाबत तपास अधिकाऱ्याचा पुरावा उलटतपासणीत आव्हानात्मक  राहिला - रिकवरी  मेमो द्वारेही  आधार दिला - न्यायचौकशी न्यायालयाद्वारे दोषसिध्दी  आणि शिक्षा कायम करण्यात आली .

आरोपी " एच"  "आर" आणि "जे"  यांच्यावर कलम ३०२/३४  आणि ४४९ आयपीसी आणि शस्त्र   अधिनियम कलम २५  अंतर्गत शिक्षापात्र गुन्ह्यासाठी विशेष न्यायालयाने खटला चालवला.  फिर्यादी पक्षाचे  प्रकरण असे आहे कि  दिनांक २८.४ . १९८४  रोजी रात्री नऊ वाजता तोंडे झाकलेली आणि पिस्तुलांसह सज्ज  असलेल्या दोन व्यक्तींनी पीडब्ल्यूडी १ च्या घरात  बेकायदेशीरित प्रवेश केला,  ज्याने  अलार्म वाजविला आणि  घुसखोरांपैकी  एकाकडून पिस्तूल हिसकावून घेतले. दरम्यान पीडब्लू १ चा मुलगा  त्यांच्या मदतीस आला आणि  त्या  झटापटीत  एका  घुसखोरांचा चेहरा उघड  झाला. आरोपी “ आर”  च्या सांगण्यावरून आरोपी “एच” ने पीडब्लू १ च्या मुलावर गोळी झाडली.  मारेकरी घराबाहेर पळाले जेथे जलौर सिंग  पिस्तूल घेऊन वाट पाहत होता.  त्यानंतर तिघे पळून गेले. गावचे सरपंचसोबत  साधू राम - पीडब्लू १

सोबत पोलीस ठाण्यात गेले आणि तक्रार नोंदवली, ज्याच्या आधारे एफआयआर नोंदवला गेला आणि तपास सुरू झाला. एफआयआर मध्ये हल्लेखोरांची नावे उघड केलेली नसल्यामुळे तपासादरम्यान पीडब्लू १ चा पुरवणी जबाब पुरवणी नोंदविला गेला, ज्यात त्याने आरोपीचे नाव दिले. बॅलेस्टिक तज्ञांच्या अहवालात स्पष्ट झाले की घटनास्थळावरून जप्त केलेली पुंगळी, आरोपी "एच" कडून जप्त करण्यात आलेल्या पिस्तुलातून झाडण्यात आली होती . शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले आहे की मृत व्यतीचा मृत्यू बंदुकीतील गोळीच्या जखमेमुळे झाला होता.

न्यायचौकशी न्यायालयाने आरोपी “एच ” ला कलम ३०२ आणि ४४९ आयपीसी आणि शस्त्र अधिनियमाच्या कलम २५ अंतर्गत शिक्षापात्र गुन्ह्यासाठी दोषी ठरवले आणि शस्त्र अधिनियमाच्या कलम २५ अंतर्गत आरोपी “आर” ला कलम ३०२/३४ आणि ४४९ आयपीसी आणि शस्त्र अधिनियमाच्या कलम २५ अंतर्गत दोषी ठरवण्यात आले. या दोघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. आरोपी “जे” ला शस्त्र अधिनियमाच्या कलम २५ अन्वये दोषी ठरवून शिक्षा सुनावण्यात आली. तिन्ही आरोपींनी प्रस्तुतचे अपील दाखल केले आहे.

आरोपी “आर” चे अपील मंजूर केले आणि इतर दोन आरोपींचे अपील फेटाळले. न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिला.

पीडब्लू १ चा पुरवणी जबाब तपासादरम्यान नोंदवलेला,ज्यामध्ये अपीलकर्त्यांची नावे होती, त्याला सीआरपी कलम १६२ लागू झाले. पी सी आणि न्यायचौकशी न्यायालय एफआयआर चा एक भाग म्हणून त्यावर विसंबून राहू शकले

नसते किंवा एफआयआर चा एक भाग समजू शकले नसते.

२.१ अपीकर्ता “आर” विरुद्ध वाजवी संशयापलीकडे खटला समाधानकारकपणे प्रस्थापित करण्यात फिर्यादी पक्ष सक्षम नाही. या संपूर्ण घटनेदरम्यान त्यांच्याकडून कोणतेही उघड कृत्य करण्यात आलेले नाही. घटनेच्या वेळी त्यांची उपस्थिती समाधानकारकपणे सिद्ध झालेली नाही. तिन्ही अपीलकर्ते भाऊ असून अपीलार्थी “आर’ चे नाव भाऊ म्हणून किंवा अपिलार्थी “ एच” असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याला संशयाचा फायदा दिला गेला आणि सर्व आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात आले. (८६० - एफ, एच, ८६१ - ए)

२.२ पीडब्लू १ यांचा जबाब की अपीलकर्ता “एच” ने मृत व्यक्तीवर गोळी झाडल्याने आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्याला वैद्यकीय पुराव्यांवरून तसेच बॅलिस्टिक तज्ज्ञांच्या अहवालातून भरपूर पुष्टी मिळते. अपीलकर्ता “एच” याला अटक होण्यापूर्वी आणि त्याच्याकडून हत्यारे जप्त होण्यापूर्वी रिक्त काडतुसे बॅलिस्टिक तज्ज्ञाकडे पाठविण्यात आली होती. (८६१ -सी )

अपीलकर्ता “ एच” च्या अटकेनंतर त्यांना पाठवलेल्या शस्त्रातील पुंगळ्यांमधून गोळीबार करण्यात आल्याचे मत बॅलिस्टिक तज्ज्ञाने व्यक्त केले. अभिलेखावरील पुराव्याने अश्याप्रकारे अपीलकर्ता “एच” विरुद्धचा आरोप अगदी वाजवी संशयापलीकडे आणला आहे आणि न्यायचौकशी न्यायालयाने नोंदविलेली त्याची दोषसिद्धी आणि शिक्षा यात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही . (८६१ - डी .)

२.३ शस्त्र अधिनियमाच्या कलम २५ अंतर्गत गुन्ह्यासाठी अपीलकर्ता " जे" ची दोषसिध्दी आणि शिक्षा योग्य आहे आणि त्यात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही. अपीलकर्ता "जे" च्या अटकेच्या वेळी त्याच्याकडून पिस्तूल हस्तगत करण्याबाबतचा तपास अधिकाऱ्याचा पुरावा उलटतपासणीत आव्हानात्मक राहिला आणि त्याला रिकव्हरी मेमोचाही आधार आहे. ( ८६० इ -डी )

फौजदारी अपीलीय अधिकारक्षेत्र : फौजदारी अपील क्र. २१२/१९९६.

प्रकरण क्र. १९४/८४ खटला क्र. ४८/१९९५ आणि एफआयआर क्र. ९६/१९८४ मध्ये फिरोजपूर येथील विशेष न्यायालयाने दिनांक १८. ४. ८५ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध.

एस . के. धिंग्रा, अपीलकर्त्यासाठी.

रणबीर यादव आणि आर. एस. सूरी, उत्तरवादीसाठी.

न्यायालयाचा न्यायनिर्णय न्या. डॉ. आनंद यांनी पारित केला.

विशेष न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांद्वारे कलम ३०२ /३४ आणि ४४९ आयपीसी अंतर्गत अपीलकर्त्यांवर खटला चालवला गेला . अपीलकर्ते हुस्ना आणि जलौर सिंग यांच्यावरही शस्त्र अधिनियमाचे कलम २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला . १८.४.१९८५ च्या निकालानुसार, न्यायचौकशी न्यायालयाने अपीलकर्ता हुस्ना याला कलम ३०२ आयपीसी अंतर्गत गुन्ह्यासाठी दोषी ठरवले आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. कलम ४४९ आयपीसी अन्वये गुन्ह्यासाठी त्याला दोषी ठरवण्यात आले

आणि त्याला सात वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आणि शस्त्र अधिनियमाचे कलम २५ अन्वये नऊ महिन्यांची शिक्षा सुनावण्यात आली. अपीलकर्ता रुपा याला कलम ३०२/३४ आयपीसी अंतर्गत गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले आणि जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्याला कलम ४४९ आयपीसी अन्वये गुन्ह्यासाठीही दोषी ठरवण्यात आले आणि सात वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. अपीलकर्ता जलौर सिंग - याला कलम ३०२/३४ आयपीसी आणि 449 आयपीसी मधील आरोपांतून निर्दोष मुक्त करण्यात आले परंतु शस्त्र अधिनियमाचे कलम २५ अंतर्गत गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले आणि त्याला नऊ महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. या वैधानिक अपीलद्वारे, अपीलकर्त्यांनी त्यांची दोषसिध्दी आणि शिक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तुरुंगातून अपील प्राप्त झाल्यामुळे, अपीलकर्त्यांसाठी अॅमिकस क्युरी (न्यायमित्र) ची नियुक्ती करण्यात आली होती.

फिर्यादी खटल्यानुसार २८ एप्रिल १९८४ रोजी साधू राम - पीडब्लू १ हे त्यांची पत्नी कौशल्या - पीडब्ल्यू ४, सतीश कुमार (मृत) आणि इतर मुलांसह रात्री ९ वाजता त्यांच्या घरी उपस्थित होते. त्यावेळी तोंडे झाकलेली आणि पिस्तुलांनी सज्ज असलेल्या दोन व्यतींनी बेकायदेशीररीत्या त्यांच्या घरात प्रवेश केला. साधू राम - पीडब्लू १ याने अलार्म लावला आणि दोन घुसखोरांपैकी एकाकडून पिस्तूल हिसकावून घेतले. झटापटी दरम्यान, घुसखोरांपैकी एकाचा चेहरा उघड झाला. मृत सतीश कुमार

वडिलांच्या मदतीला धावून आला. अपीलकर्ता रूपा याच्या आग्रहास्तव, अपीलकर्ता हुस्ना याने एक गोळी झाडली जी सतीश कुमार यांच्या चेहऱ्यावर लागली आणि ते खाली पडले. रुपा आणि हुस्ना दोघे घरातून बाहेर पळत गेले जिथे जलौर सिंग पिस्तुल घेऊन आधीच थांबला होता . त्यानंतर तिन्ही आरोपी पळून गेले. साधू राम - पीडब्लू 1 यांनी सतीश कुमारजवळ जाऊन पाहिले असता तो मृतावस्थेत आढळून आला . शामलाल आणि मलकियत सिंग, गावचे सरपंच, साधू राम पीडब्लू १ यांच्यासोबत पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यासाठी गेले. त्या अहवालाच्या आधारे औपचारिक एफआयआर निशाणी पी १ नोंदवण्यात आला . तपास हातात घेतला गेला आणि तपास अधिकारी पी डब्लू १ चे घरी गेले . मृत सतीश कुमारची आई श्रीमती.कौशल्या - पीडब्लू ४, कुटुंबातील इतर काही सदस्यांसह मृतदेहाजवळ बसली होती आणि चौकशी केली. ती उन्मादग्रस्त झाली आणि घटनेचा कोणताही सुगावा किंवा तपशील देऊ शकली नाही. चौकशी अहवाल तयार करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. घटनास्थळावरून रिकव्हरी मेमो निशाणी पी ५ द्वारे ३१५ बोअरचे रिकामे काडतूस ताब्यात घेण्यात आले. ते एका पार्सलमध्ये सीलबंद केले होते. मेमो निशाणी पी ६ द्वारे रक्ताने माखलेली वीट देखील ताब्यात घेण्यात आली. नंतर ३१५ बोअरची आणखी दोन रिकामी काडतुसे आणि ३२ बोअरची एक रिकामे काडतूसही जप्त करून मेमो एक्स द्वारे ताब्यात घेण्यात आली. मृतदेहाचे शवविच्छेदन डॉ. अनुप सूद पीडब्ल्यू ७ द्वारे करण्यात आले, ज्यामध्ये डॉक्टरांना उलट्या मार्जिंगसह पूर्व-मॉर्टम लॅसेरेटेड पंक्चर झालेल्या जखमेची उपस्थिती उघडकीस आली. सतीशकुमार याचा मृत्यू

डॉक्टरांच्या मते वरील जखमेच्या परिणामी शॉक आणि रक्तस्त्रावामुळे झाला होता जो मृत्यूला कारणीभूत ठरण्यासाठी निसर्गाच्या सामान्य ओघात पुरेसे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. एफआयआरमध्ये हल्लेखोरांची नावे उघड करण्यात आली नसल्यामुळे, तपासादरम्यान पी डब्ल्यू १ चा पुरवणी जबाब नोंदवण्यात आला ज्यामध्ये त्याने आरोपींची नावे दिली. अपीलकर्ता हुस्ना आणि जलौर सिंग यांना ३ जून १९८४ रोजी अटक करण्यात आली आणि त्यांच्याकडून शस्त्रे जप्त करण्यात आली. अपीलकर्ता रूपा याला इतर काही प्रकरणात आधीच अटक झाली होती आणि १२ जून १९८४ रोजी औपचारिकपणे प्रस्तुतच्या प्रकरणात अटक करण्यात आली होती असे दाखवण्यात आले होते. घटनास्थळावरून जप्त केलेल्या पुंगळ्या आणि अपीलकर्ता हुस्ना याच्याकडून जप्त केलेले पिस्तूल संचालक, न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा, चंदीगड यांच्याकडे पाठविण्यात आले होते., ज्यांनी त्यांच्या अहवाल निशाणी पी १८ द्वारे असे मत दिले की घटनास्थळावरून जप्त केलेली पुंगळी अपीलकर्ता हुस्ना याच्या पिस्तुलातून झाडण्यात आली होती . अपीलकर्त्यांना गुन्ह्याशी जोडण्याच्या उद्देशाने फिर्यादीने साधू राम - पी डब्ल्यू १ व्यतिरिक्त जितसिंग - पी डब्ल्यू २ , ड्राफ्ट्समन - पी डब्लू - ५ , तपास अधिकारी - पी डब्ल्यू ६ आणि डॉ. अनुप सूद - पी डब्ल्यू ७ यांची तपासणी केली. अवतार सिंग- पी डब्ल्यू ३ आणि श्रीमती. कौशल्या - पी डब्ल्यू ४ ची देखील उलटतपासणीसाठी करण्यात आली होती. फिर्यादी पक्षाने पोलिस अधिकाऱ्यांचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले, ज्यांचे पुरावे खटल्याच्या वेळी औपचारिक स्वरूपाचे होते. कलम सीआरपीसी कलम ३१३ अंतर्गत नोंदविलेल्या त्यांच्या जबाबात

अपीलकर्त्यांनी त्यांच्यावरील फिर्यादीचे आरोप नाकारले आणि खोटे आरोप लावले.

आम्ही पक्षकारांचे विद्वान वकील यांचे म्हणणे ऐकले आणि अभिलेख तपासले.

न्यायचौकशी न्यायालयाने जलौर सिंगला कलम ३०२/३४ आयपीसी आणि ४४९ आयपीसी अंतर्गत आरोपातून निर्दोष मुक्त केले आणि राज्याने त्याच्या निर्दोष सुटकेविरुद्ध कोणतेही अपील दाखल केलेले नाही. अटकेच्या वेळी त्याच्याकडून पिस्तूल जप्त केल्याचे लक्षात घेता, उलटतपासणीत या प्रकरणाच्या त्या पैलूवर तपास अधिकाऱ्याचा पुरावा आव्हानात्मक राहिला. तपास अधिकाऱ्यांच्या जबाबाला रिकव्हरी मेमोचाही आधार आहे. जलौर सिंगला शस्त्र अधिनियमाच्या कलम २५ अंतर्गत गुन्ह्यासाठी दोषी ठरवणाऱ्या न्यायचौकशी न्यायालयाच्या आदेशात अपीलकर्त्याचे विद्वान वकिल कोणतीही कमतरता दर्शवू शकले नाहीत. आमच्या मते, शस्त्र अधिनियमाच्या कलम २५ अंतर्गत गुन्ह्यासाठी अपीलकर्ता जलौर सिंगची दोषसिद्धी आणि शिक्षा योग्य आहे आणि आम्हाला त्यात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण दिसत नाही.

आता येत आहोत अपीलकर्ते हुस्ना आणि रूपा यांच्या प्रकरणाकडे.

आधीच लक्षात आल्याप्रमाणे, एफआयआरमध्ये दोन्ही अपीलकर्त्यांची नावे सापडली नाहीत. तपासादरम्यान नोंदवलेल्या पी डब्ल्यू१ च्या पुरवणी जबाबांमध्ये फक्त त्यांची नावे होती आणि आमच्या मते तो जवाब जो तपासादरम्यान नोंदवला

गेला होता त्याला सीआरपीसी कलम १६२ लागू होते आणि एफआयआरचा एक भाग म्हणून त्यावर न्याय चौकशी न्यायालय अवलंबून राहू शकले नसते. तीनही अपीलकर्ते भाऊ आहेत. संपूर्ण घटनेदरम्यान अपीलकर्ता रूपा ह्याच्यावर कोणतेही उघड कृत्य केले गेले नव्हते. हुस्नाने सतीश कुमारवर गोळी झाडण्यापूर्वी पी डब्ल्यू १ ने अपीलकर्ता रुपाकडून पिस्तूल हिसकावून घेतले असते, तर हुस्नाला गोळी झाडण्यापासून रोखण्यासाठी त्याने असाच गोळीबार केला नसता, हे अगदीच अशक्य वाटते. याशिवाय घटनास्थळावरून जप्त केलेली कोणतीही रिकामी पुंगळी अपीलकर्ता रूपाकडून जप्त करण्यात आलेल्या पिस्तूलशी बॅलेस्टिक तज्ज्ञाने जोडलेली नाही. अभिलेखा वरील पुराव्याचे काळजीपूर्वक विश्लेषण केल्यानंतर, आम्ही असे मत व्यक्त करतो की फिर्यादी पक्ष अपीलकर्ता रूपा विरुद्ध वाजवी संशयापलीकडे खटला समाधानकारकपणे प्रस्थापित करू शकला नाही. हुस्नाचे भाऊ असल्याने त्याचे नाव असण्याची शक्यता नाकारता येत नाही. घटनेच्या वेळी त्याची उपस्थिती समाधानकारकपणे सिद्ध झालेली नाही. त्यामुळे न्याय चौकशी न्यायालयाने नोंदवलेल्या विविध गुन्ह्यांसाठी त्याची दोषसिध्दी आणि शिक्षा प्रमाणित केली जाऊ शकत नाही.

डॉ. अनुप सूद - पी डब्ल्यू ७ यांना आढळल्याप्रमाणे, सतीश कुमारचा मृत्यू पिस्तुलातील गोळीच्या दुखापतीमुळे झाला होता , यात शंका नाही. त्याची न्याय चौकशी न्यायालयात किंवा या न्यायालया समोरही चौकशी झाली नाही. सतीश कुमार यांच्यावर गोळी झाडणारा अपीलकर्ता हुस्ना होता असे पी डब्ल्यू १ चा जबाब

आत्मविश्वासाला प्रेरणा देतो आणि वैद्यकीय पुराव्यांवरून तसेच बॅलेस्टिक तज्ञ ज्यांना घटनास्थळावरून पुंगळ्या सापडल्या होत्या आणि ज्या अपीलकर्ता हुस्ना कडून जप्त केलेल्या शस्त्रामधून गोळीबार करण्यात आला, या त्यांच्या अहवालाला पुष्कळ पुष्टीकरण प्राप्त होते. अपीलकर्ता - हुस्नाला अटक होण्यापूर्वी आणि त्याच्याकडून शस्त्रे जप्त होण्यापूर्वी बॅलिस्टिक तज्ञाकडे पुंगळ्या पाठवण्यात आल्या असल्याने, त्याच्या विरुद्ध खटल्याच्या अचूकतेचे अवास्तव आश्वासन आहे. बॅलिस्टिक तज्ञाने असे मत व्यक्त केले की त्यांना पुंगळ्या त्यांना आधीच प्राप्त झाल्या होत्या आणि हुस्नाच्या अटकेनंतर त्यांना पाठवलेल्या शस्त्रामधून त्याद्वारे गोळीबार झाला होता. अभिलेखावरील पुराव्यांवरून, अशा प्रकारे, अपीलकर्ता हुस्नाला प्रत्येक वाजवी संशयापलीकडे दोषारोप दिला गेला आहे आणि न्यायचौकशी न्यायालयाने नोंदवलेल्या विविध गुन्ह्यांसाठी त्याची अपराधसिद्धी आणि शिक्षा योग्य आहे आणि त्यात कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.

वरील चर्चेच्या परिणामी, अपीलकर्ते हुस्ना आणि जलौर सिंग यांची अपिले फेटाळण्यात आली आहेत. अपीलकर्ता रूपाचे अपील मंजूर करून त्याला संशयाचा फायदा देऊन, त्याला सर्व आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. इतर कोणत्याही खटल्यात आवश्यक नसल्यास, त्याला ताबडतोब कोठडीतून सोडण्यात यावे.

आरोपी “ आर ” चे अपील मंजूर करण्यात आले आहे आणि इतर दोन

आरोपींचे अपील फेटाळण्यात आले आहे.

---

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाचा मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेत त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि  अंमलबजावणीकरता वैध मानला जाईल.

XXXX